

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

तमाम जनतेस दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा ! www.katusatyanews.com



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ९६ वा | मंगळवार, दि. १० नोव्हेंबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवाना: – SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR









संपादकीय

शाळेचे छत महत्त्वाचे की मंदिराचा कळस?

आज गावोगावी मंदिरे आणि सभामंडप उभारण्यासाठी लाखो रुपयांची वर्गणी गोळा केली जाते. धार्मिक उत्सव, भंडारे, महाप्रसाद आणि जेवणावळींसाठी मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग लाभतो.

नवरात्रीत देवीची ज्योत आणण्यासाठी तरुण कित्येक मैल अनवाणी धावतात. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या कार्यक्रमांसाठी ग्रामस्थ रात्रंदिवस झटतात. यावरून सामूहिक इच्छाशक्ती आणि एकजुटीची कमतरता आपल्या समाजात नाही, हे स्पष्ट होते, मात्र, याच गावांतील जिल्हा परिषदेच्या शाळेची इमारत मोडकळीस आलेली असते, छत गळत असते, वर्गखोल्यांची दुरवस्था झालेली असते आणि विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधाही मिळत नसतात. तेव्हा हीच सामूहिक शक्ती शिक्षणाच्या प्रश्नावर एकवटताना का दिसत नाही? हा प्रश्न श्रद्धेला विरोध करण्याचा नसून, समाज म्हणून आपले प्राधान्यक्रम काय आहेत, हा आहे.

शाळेचे छत गळत असताना आपण मंदिराचा कळस चढवत असू, तर आपल्या विकासाच्या कल्पनेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मंदिर अनेकांसाठी श्रद्धेचे प्रतीक असते; परंतु शाळा ही पुढच्या पिढीच्या भविष्याचा पाया असते. श्रद्धा जपताना शिक्षणाप्रतिची सामूहिक जबाबदारी विसरणे, हे आपल्या सामाजिक जाणिवांचे अपयश आहे. महात्मा जोतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. वंचित आणि उपेक्षित समाजाला समान संधी मिळावी, अज्ञान आणि विषमता दूर व्हावी, यासाठी त्यांनी संघर्ष केला. त्यांच्या विचारांचा वारसा सांगर्णाया महाराष्ट्रात आजही ग्रामीण भागांतील मुलांना मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत असेल, तर ही बाब आत्मपरीक्षण करावे अशीच आहे.

आपण महापुरुषांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना अभिवादन, कार्यक्रमांचे आयोजन आणि भाषणांच महत्त्व दिले आहे; मात्र त्यांच्या विचारांचा स्वीकार करून ते प्रत्यक्ष आचरणात आणण्याकडे दुर्लक्ष केले आहे. परंतु त्यांच्या विचारांचा खरा सन्मान शिक्षणाच्या संधी सर्वांपर्यंत पोहोचवण्यात आहे याचा विसर पडल्याचे दिसते. समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन आणि विवेक रुजवायचा असेल, तर शिक्षणाला केवळ घोषणांमध्ये नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीत अग्रक्रम द्यावा लागेल.

आज आपण शिक्षणाच्या गप्पा फक्त प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिनाच्या भाषणांपुरत्या मर्यादित ठेवलेल्या दिसतात. विद्यार्थ्यांना देशाचे भविष्य म्हटले जाते. शिक्षणातून देशाची प्रगती होईल, ग्रामीण भागाचा विकास होईल, अशा घोषणा केल्या जातात. ध्वजवंदन होते, भाषणे संपतात आणि आपण पुन्हा नेहमीच्या आयुष्यात व्यग्र होतो. शाळेचे गळणारे छत, अपुऱ्या सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या भविष्याचे प्रश्न तसेच राहतात. शिक्षणाविषयीची आपली आस्था भाषणांपुरतीच मर्यादित राहणार असेल, तर त्या भाषणांना अर्थ काय?

राज्यातील शाळांच्या स्थितीची आकडेवारीही अस्वस्थ करणारी आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवाल २०२२-२३ च्या आधारे प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीत राज्यातील ६४३ प्राथमिक शाळा बंद झाल्या. त्यापैकी २०१९-२० ते २०२०-२१ या काळात १५३, तर २०२०-२१ ते २०२१-२२ या काळात ४९० शाळा बंद झाल्याची नोंद होती. कोविड काळातील परिस्थितीचाही या घडामोडींवर परिणाम झाला असण्याची शक्यता आहे.

केंद्र सरकारच्या UDYIYSXE आकडेवारीनुसार, राज्यातील सरकारी शाळांची संख्या २०२०-२१ मध्ये ६५,७३४ होती, ती २०२४-२५ मध्ये ६४,८८४ झाली. चार वर्षांत सरकारी शाळांच्या संख्येत ८५० ची घट झाली. मात्र, शाळांच्या एकूण संख्येतील घट आणि प्रत्यक्ष कायमस्वरूपी बंद झालेल्या शाळांची संख्या यांत फरक आहे. काही शाळांचे विलीनीकरण किंवा इतर प्रशासकीय बदल झालेले असू शकतात. त्यामुळे या आकडेवारीचा अर्थ काळजीपूर्वक समजून घेणे आवश्यक आहे.

आकडेवारीपलीकडचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. एखाद्या गावातील शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला जातो, तेव्हा त्या गावातील मुलांचे पुढे काय होते? त्यांना दुर्सया गावातील शाळेत जावे लागते का? प्रवासाचा वेळ आणि खर्च वाढतो का? लहान मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो का? शाळा दूर असल्यामुळे एखादे मूल शिक्षणापासून वंचित राहण्याची शक्यता वाढते का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय शाळा बंद करण्याच्या निर्णयाला केवळ प्रशासकीय कार्यक्षमता म्हणता येणार नाही.

विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली म्हणून शाळा बंद करणे सोपे असते; पण ती संख्या कमी का झाली, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे असते. पालक खासगी शाळांकडे का वळत आहेत? सरकारी शाळांविषयी त्यांच्या मनात अविश्वास का निर्माण होतो? शाळेतील सुविधांची कमतरता, शिक्षणाच्या गुणवत्तेविषयीच्या अपेक्षा आणि गावातील बदलती सामाजिक- आर्थिक परिस्थिती यांचा अभ्यास केला जातो का? शाळा टिकवण्यासाठी आणि तिची गुणवत्ता सुधारण्यासाठी आवश्यक प्रयत्न केले जातात का? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याऐवजी शाळाच बंद केली, तर समस्येचे निराकरण होणार की तिचे स्वरूप अधिक गंभीर होणार?

शाळा बंद पडणे म्हणजे केवळ एक इमारत ओस पडणे नव्हे. गावातील मुलांसाठी उपलब्ध असलेली शिक्षणाची संधी कमी होण्याचा तो धोका आहे. विशेषतः आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील मुलांसाठी सरकारी शाळा महत्त्वाचा आधार असतात. ज्यांना खासगी शाळांचा खर्च परवडत नाही, त्यांच्यासाठी जवळची सरकारी शाळा ही शिक्षणाची सहज उपलब्ध असलेली संधी असते. तीच शाळा बंद झाली आणि पर्यायी व्यवस्था पुरेशी नसेल, तर त्याचा सर्वाधिक फटका ज्यांच्याकडे पर्याय कमी आहेत, अशा मुलांना बसू शकतो.

शाळेत प्रवेश मिळाला म्हणजे शिक्षणाचा प्रश्न सुटला, असेही नाही. मुलाने शिक्षण पूर्ण केले का, माध्यमिक स्तरापर्यंत तो टिकून राहिला का आणि आर्थिक परिस्थितीमुळे त्याला शिक्षण सोडून कामावर जावे लागले का, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. केंद्र सरकारच्या वऊकरए २०२४-२५ अहवालानुसार, महाराष्ट्रात इयत्ता नववी आणि दहावीतील विद्यार्थ्यांचा शाळा सोडण्याचा दर ११.५ टक्के होता. मुलांमध्ये हा दर १२.६ टक्के, तर मुलींमध्ये १०.३ टक्के होता. त्यामुळे माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची गळती हा चिंतेचा विषय आहे. अर्थात, शाळा सोडर्णाया प्रत्येक विद्यार्थ्याने आर्थिक कारणामुळेच शिक्षण सोडले, असे या आकडेवारीवरून म्हणता येत नाही. त्यामागे स्थलांतर, कौटुंबिक जबाबर्दाया आणि इतर कारणेही असू शकतात. मात्र, आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण सोडून कामाला लागर्णाया मुलांचा प्रश्न स्वतंत्रपणे समजून घेणे गरजेचे आहे.

एखाद्या घरातील मूल कुटुंबाला हातभार लावण्यासाठी कामावर जाते, तेव्हा त्या कुटुंबाची तातडीची गरज भागत असेल. पण त्या मुलाच्या शिक्षणाचे काय? शिक्षण पूर्ण झाले असते, तर त्याच्यासमोर निर्माण होऊ शकर्णाया संधींचे काय? गरिबीमुळे एखाद्या मुलाला शिक्षण सोडावे लागणे ही केवळ त्या कुटुंबापुरती समस्या नाही. त्यामुळे आर्थिक आणि सामाजिक विषमता पुढच्या पिढीतही कायम राहण्याचा धोका निर्माण होतो. म्हणूनच मुलांना शाळेत आणण्याबरोबरच त्यांना शाळेत टिकवून ठेवणे आणि शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक आधार देणे महत्त्वाचे आहे.

या परिस्थितीसाठी केवळ पालकांना किंवा शिक्षकांना दोष देऊन चालणार नाही. सरकारी शाळांची दुरुस्ती करणे, आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे, शिक्षकांची रिक्त पदे भरणे आणि शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे ही सरकारची जबाबदारी आहे. लोकसहभागाच्या नावाखाली सरकारला आपली जबाबदारी टाळता येणार नाही. त्याच वेळी गावातील नागरिक, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामपंचायत आणि तरुण यांनीही शाळेच्या प्रश्नाकडे गांभीयार्ने पाहिले पाहिजे.

ग्रामसभेत शाळांच्या प्रश्नांवर चर्चा झाली पाहिजे. इमारतीची दुरवस्था प्रशासनापर्यंत पोहोचवणे, सुविधांसाठी पाठपुरावा आणि आर्थिक प्रश्नांमुळे शिक्षण सोडण्याच्या उंबरठ्यावर असलेल्या मुलांना मदत मिळवून देणे, यासाठी सामूहिक प्रयत्न होऊ शकतात. गावातील तरुणांनी या प्रश्नात पुढाकार घेतला, तर शाळेच्या गरजा प्रशासनापर्यंत पोहोचवण्यापासून विद्यार्थ्यांना शिक्षणात टिकवून ठेवण्यापर्यंत अनेक कामांना गती मिळू शकते. लोकसहभागाने सरकारी जबाबदारीची जागा घेऊ नये; उलट ती जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रशासनावर दबाव निर्माण करावा.


शेवटी प्रश्न मंदिराचा, भंडार्याचा किंवा धार्मिक श्रद्धेचा नाही. प्रश्न आहे आपल्या विकासाच्या कल्पनेचा. गावात भव्य मंदिर उभे राहते, उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होतात आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी हजारो लोक एकत्र येतात; पण त्याच गावातील शाळा मोडकळीस येत असेल आणि मुलांना शिक्षण अर्धवट सोडावे लागत असेल, तर त्या विकासाचा अर्थ काय? धार्मिक आणि सामाजिक उपक्रमांसाठी दिसणारी एकजूट शिक्षणाच्या प्रश्नावरही कृतीत उतरली पाहिजे.

१५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीला विद्यार्थ्यांना देशाचे भविष्य म्हणणे सोपे आहे. पण त्या भविष्याला सुरक्षित वर्गखोली, दर्जेदार शिक्षण आणि शिक्षण पूर्ण करण्याची संधी उपलब्ध करून देणे अधिक महत्त्वाचे आहे. भाषणातील शिक्षण आणि प्रत्यक्षातील शिक्षण यामधील दरी मिटवण्याची जबाबदारी सरकारबरोबरच समाजाचीही आहे.

शाळा बंद पडणे हा केवळ शिक्षण व्यवस्थेचा प्रश्न नाही; तो समाजाच्या भविष्याशी जोडलेला प्रश्न आहे. प्रत्येक मुलाला गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही सरकारची जबाबदारी आहे, तर त्यासाठी व्यवस्थेला जाब विचारणे हे समाजाचे कर्तव्य आहे. प्रत्येक मुलासाठी शिक्षणाची संधी टिकवून ठेवली नाही, तर उद्या शिक्षणापासून वंचित राहिलेल्या पिढीला दोष देण्याचा नैतिक अधिकारही आपल्याला उरणार नाही. कारण शाळा वाचवणे म्हणजे केवळ एक इमारत टिकवणे नव्हे, तर एका पिढीच्या भविष्याच्या शक्यता जिवंत ठेवणे होय.

रायगड जिल्ह्यातील टोरंट प्रकल्प; वनविभाग झाडांचे संरक्षण करण्यासाठी की,कत्तल करण्यासाठी? वन्यप्राणी;जगावे की मरावे!

राज्यासह देशात विकासाच्या नावाखाली अंदाधुंद वृक्षांची कत्तल होत आहे.याचे जिवंत उदाहरण रायगड जिल्ह्यातील कर्जतमधील टोरंट प्रकल्प सर्वांच्या डोळ्यासमोर आहे. एकीकडे वृक्ष कटाईमुळे ऑक्सिजनची मात्रा दिवसेंदिवस कमी कमी होत असुन सर्वांचा जीव गुदमरत आहे;तर दुसरीकडे प्रदूषणाचे प्रमाण वाढत आहे यामुळे मानव व पशुपक्षांचे जगणे कठीण झाले असून सर्वांच्याच आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. सध्याच्या परिस्थितीत देशासह राज्यात विकासाच्या नावाखाली वृक्षांची बेसुमार कटाईचा सपाटा जोरदार सुरू आहे त्यामुळे असे वाटत आहे की, देशात हे चाल्लय तरी काय! झाडांची अशीच कत्तल होत रहाली तर असे समजायला हरकत नाही की, माणसातील माणुसकी हरपली व मानुस माणुसकीत न रहाता जनावरापेक्षा निपत्तर झाला आणि माणुसकी संपुष्टात आली असे म्हणायला हरकत नाही. आज सर्वांच्याच आरोग्याच्या दृष्टीने ज्याची नितांत गरज आहे अशा वृक्ष देवतेची व पृथ्वी मातेची सरकार व वनविभाग सरेआम अवहेलना करीत असून कत्तल करीत आहे. यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीव-जंतुंनी स्वास घ्यायचा कसा असा गंभीर आणि जटील प्रश्न देशापुढे व देशाच्या १४५ कोटी जनतेपुढे उपस्थित होत आहे. आज आपल्यालाच नाही तर सर्वांनाच निसगार्मुळे म्हणजेच वृक्षांमुळे नैसर्गिक ऑक्सिजन मिळत आहे व सर्वत्र सुखशांती दिसून येते.परंतू देशासह राज्यात अनेक प्रकल्प उभारून प्रदूषणामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने संपूर्ण पृथ्वीतलावरील जीवजंतूचा जीव धोकादायक स्थितीत येऊन ठेपला आहे.सरकारने गेल्या काही वर्षांत निसर्गाचे संपूर्ण वाटोळे केले असून त्याचा परिणाम म्हणून,वनवे लागने, भुस्खलन, अती उष्णता, पिण्याच्या पाण्याची पातळी कमी होणे इत्यादी अनेक समस्यांनमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यांचे गंभीर परिणाम अलनिनोच्या माध्यमातून राज्यासह देशात दिसत आहे. सरकारने अनेक प्रकल्पांचा सपाटा लावला असला तरी अनेक प्रकल्पांच्या तुलनेत वृक्षलागवड नगन्य असल्याचे दिसून येते. कारण प्रश्न असा उद्भवतो की, जमीनीवर अवाढव्य प्रकल्प उभारल्यानंतर सरकार झाडे लावणार कुठे? सरकार प्रकल्प उभारल्यानंतर झाडे लावण्याचे जे दावे करतात ते संपूर्ण दावे खोटे व फोल असल्याचे मी समजतो आणि हेच काम सरकार कर्जत तालुक्यातील टोरंट पॉवर प्रकल्पाच्या बाबतीत करीत आहे. सरकार म्हणते की, टोरंट प्रकल्पाला लागणारी २५३ हेक्टर जमीनीच्या बदलत्या, दुसऱ्या २५३ हेक्टर पयार्यी जमिनीवर ९० हजार झाडे लावणार असल्याचे सरकार सांगत आहेत.मला हे समजत नाही की,जमीन काय झाडांना लागते का? अचानक २५३ हेक्टर जमीन सरकार उपलब्ध करून देणार कोठून आणि आता लावलेली झाडे मोठी व्हायला कमीत कमी दहा वर्षे लागतील याचा विचार सरकार का करीत नाही ?सरकारच्या या प्रकल्पावरून सिध्द होते की, सरकार जी झाडे लावण्याची गोष्ट करीत आहे ती फक्त कागदावरच राहिल कृतीत होने कदापि शक्य नाही असे माझे स्पष्ट मत आहे.जो रायगड जिल्हा जगप्रसिद्ध आहे व ज्या भुमित शिवाजी महाराजांचा इतिहास दडलेला आहे अशा हिरवागार गालिचा सरकार विकासाच्या नावाखाली नेस्तनाबूत करीत असेल तर ही बाब कोन्हिही सहन करणार नाही.सरकारने जर जबरदस्तीने वृक्षतोड केली तर, संपूर्ण महाराष्ट्र पेटून उठल्या शिवाय रहाणार नाही ही बाब सरकारने व वनविभागाने लक्षात ठेवली पाहिजे. देशातील काही राज्यांत ओला दुष्काळ तर काही राज्यांत कोरडा दुष्काळ दिसून येत आहे.एवढे सर्व गंभीर परिणाम पृथ्वीवर सरकारला दिसत असून सुद्धा नवीन प्रकल्पाच्या उभारणीसाठी लाखों वृक्षांची कत्तल सरकार करण्याच्या तयारीत सरकार आहे ही अत्यंत शरमेची आणि लाजिरवाणी बाब म्हणावी लागेल. रायगड जिल्ह्याच्या कर्जत तालुक्यातील टोरंट कंपनीचा पंप स्टोरेज ऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी सरकारची मोठ्या प्रमाणात खटाटोप सुरू आहे. परंतु या प्रकल्पामुळे राज्याला व राज्यातील जनतेला किती मोठे नुकसान होणार आहे याकडे सरकार दुर्लक्ष करीत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब म्हणावी लागेल. सह्यांद्रीच्या कुशीत खुप काही दडलेले आहे त्यावर सरकारने जर वक्र नजर टाकली तर राज्य विनाशाच्या उंबरठ्यावर येऊ शकते यालाही नाकारता येत नाही. सह्याद्रीच्या जंगलात सुरू असलेल्या वृक्षतोडीचा संबंध प्रामुख्याने रायगड जिल्ह्यातील कर्जत जवळील सायडोंगर परिसरात एका मोठ्या ऊर्जा प्रकल्पाशी आहे. 'टोरंट पॉवर' या कंपनीच्या ३,००० मेगावॅट क्षमतेच्या 'पंप स्टोरेज हायड्रो प्रोजेक्ट'साठी मोठ्या प्रमाणावर झाडे कापण्यास वन विभागाने परवानगी दिली आहे, वनविभाग झाडे लावण्याचे काम करतात की तोडण्याचे काम करतात ही बाब आमजनतेच्या समजण्यापलीकडची आहे.त्यामुळे आता राज्यासह देशात वनविभाग रहाला नसून वनकत्तल विभाग झाला की काय असे चित्र दिसत आहे. त्यामुळे याकरिता जनतेचा मोठा आक्रोश सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील सायडोंगर क्षेत्र, जे भीमाशंकर वन्यजीव अभयारण्याच्या बफर झोनच्या किंवा जंगलाच्या जवळ आहे. या प्रकल्पासाठी जवळपास २५३ हेक्टर वन जमीन वळवण्यात येत आहे.सरकारी आणि वन विभागाच्या कागदपत्रांनुसार ३२,४९० झाडे तोडण्यास मंजुरी देण्यात आली आहे.परंतु हा आकडा ५० हजारांच्या वर असू शकतो यालाही नाकारता येत नाही. आज ५० वर्षे जुनी ३२४९० झाडांपासून मिळणारी शुद्ध हवा आणि ऑक्सिजन वृक्ष कटाईनंतर मिळणार कोठून आणि त्या झाडाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशुपक्ष्यांचे काय होणार याचा विचार सरकारने केला का? सरकार प्रकल्प उभारणीच्या पुर्ण तयारीत आहे. त्या अनुषंगाने सरकार वनविभाला २५३ हेक्टर पयार्यी जमीन देणार असल्याचे सांगितले जाते व त्यावर ९० हजार झाडे लावणार असल्याचे म्हटले जाते. यावर मी सरकारला प्रश्न विचारतो की,२५३ हेक्टर जमीन आणणार कोठून; २५३ हेक्टर जमीनीची भरपाई करण्यासाठी सरकार राजकीय पुढाऱ्यांजवळ असलेल्या शेकडो हेक्टर जमीनीतुन देणार का? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.आज राजकीय पुढाऱ्यांजवळ वाममागार्ने कमविलेली शेकडो हेक्टर जमीन आहे त्यावर सरकार वृक्ष लागवड का करीत नाही? सरकार म्हणते की,स्थानिक ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून त्यातून मार्ग काढला जाईल, सरकार प्रकल्पासाठी हजारो झाडे कापण्याच्या तयारीत आहे आणि ग्रामस्थांशी चर्चा करण्याची भाषा करतात हा सर्व सरकारचा लपंडाव सुरू असल्याचे दिसून येते.जर शिवरायांचा इतिहास आणि जागतिक वारसा जीवीत ठेवायचा असेल तर, टोरंट प्रकल्पाला थांबविण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्राने पेटून उठले पाहिजे व यापुढे टोरंट सारखे प्रकल्प थांबवुन निसर्ग वाचविला पाहिजे आणि याचे पालन वनविभागाने सुध्दा केले पाहिजे. कारण आज जंगल तोडीमुळे अनेक पशुपक्षांचे घरे उद्धवस्त झाली आहेत व त्यांच्या जिवाला मोठा धोका निर्माण झाला आहे याची जाणीव सरकारने व वनविभागाने ठेवली पाहिजे. सरकारने प्रकल्प अवश्य उभारावे याला कोणाचाही विरोध नाही.परंतु निसगार्ची राखरांगोळी होणार नाही याचीही खबरदारी सरकारने घेतली पाहिजे. कारण एक झाड मोठे व्हायला कमीत कमी ५ ते १० वर्षाचा कालावधी लागतो म्हणजे (१८२५ ते ३६५० दिवस)आणि ५ ते १० वषार्चा कालावधी म्हणजे कमी नाही याची जाणीव सरकारने ठेवली पाहिजे.आज सरकार मोठ्यांने दावे करीत आहे की, आम्ही मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करीत आहोत.परंतु सत्यपरिस्थिती अशी आहे की, फक्त फोटो सेशन पुरते वृक्षारोपण असते त्यानंतर त्या वृक्षांकडे कोणताही राजकीय पुढारी ढुंकूनही पाहत नाही ही सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे सरकारच्या मार्फत होणारे ९० टक्के वृक्षारोपण हे फक्त कागदावरच असते व १० टक्के वृक्षारोपण जमिनीवर होते. त्यामुळे सरकारच्या करणीत आणि कथनीमध्ये जमीन-आसमानचा फरक आहे.टोरंट पॉवर प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून सुमारे १६ किलोमीटर अंतरावर, तर भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किलोमीटर अंतरावर जरी असला तरी या प्रकल्पाचा मोठा धोका वन्यजीव प्राण्यांना व पर्यटकांना होईल यात तिळमात्र शंका नाही.आज वृक्षतोडीमुळे अनेक औषधीयुक्त वृक्ष लुप्त झाली आहेत व काही झाडे लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.त्याचप्रमाणे अनेक पशुपक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत किंवा त्यांची संख्या कमी झाली आहे.अशी भयावह गंभीर परिस्थिती वृक्षतोडीमुळे राज्यासह देशात निर्माण झाली आहे.त्यामुळे सरकारने वन्यप्राण्यांची घरे उद्धवस्त होणार नाही व त्यांच्या जीवाला धोका निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे; सोबतच हवामानातील वाढता बदल पहाता व स्थल ,जल, वायू प्रदूषणाचा वाढता प्रभाव लक्षात घेता निसर्गाची जोपासना करण्याचा संकल्प सरकारने घेतला पाहिजे व टोरंट प्रकल्पाला ताबडतोब स्थगिती देऊन निसर्गाचे व वन्यप्राण्यांचे रक्षण व्हायला हवे.



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण हा विचार घेऊन एक हजार महिलांना आनंदाचा शिधा वाटप

दिवाळी घरात नाही, तर बळीराजाच्या बांधावर साजरी करणार : खासदार ज्योतीताई वाघमारे यांचा निर्धार

नातेपुते (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्रावर दुष्काळाचे सावट असताना संकटात सापडलेल्या शेतकरी आणि शेतमजूर कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीच्या निमित्ताने आनंद फुलविण्यासाठी मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण

हा विचार घेऊन शिवसेनेचे सोलापूर जिल्हा ओबीसी प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी शिवसेना भवन, नातेपुते येथे खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या हस्ते शेतकरी सेवा केंद्राचे उद्घाटन करून माळशिरस तालुक्यातील एक हजार शेतकरी महिलांना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने लाडक्या बहिणींसाठी पाठविण्यात आलेल्या 'आनंदाचा शिधा'चे वाटप खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले .या उपक्रमामुळे दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करण्याचा प्रयत्न शिंदे गटाच्या शिवसेनेकडून करण्यात आला.यावेळी बोलताना खासदार ज्योतीताई वाघमारे म्हणाल्या की,



महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सोलापूर जिल्ह्यातील सर्व ११ तालुक्यांनाही दुष्काळाचा फटका बसला आहे. खासदार झाल्यानंतर माझी ही पहिलीच दिवाळी असून ती दुष्काळाच्या सावटाखाली आली आहे. मात्र, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार ही दिवाळी घरात साजरी न करता शेतकऱ्यांच्या बांधावर, शेतमजुरांच्या सोबत आणि बळीराजाच्या सान्निध्यात साजरी करण्याचा मी संकल्प केला आहे.महाराष्ट्रभर हजारो ट्रकच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त शेतकरी आणि बळीराजासाठी आनंदाचा शिधा पाठविण्यात आला आहे. 'मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण' हा विचार घेऊन शिवसेना आज जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत आहे. भगवा खांद्यावर घेऊन शिवसैनिक केवळ राजकारण करत नाहीत, तर बळीराजाच्या बांधावर जाऊन त्याच्या संकटात मदतीचा हात देतात, हे या उपक्रमातून दिसून येत आहे असल्याचे प्रतिपादन खासदार ज्योतीताई वाघमारे यांनी केले तसेच त्यांनी सांगितले की,

मी राज्यभर दौरे करत असताना माळशिरस तालुक्यातील दुष्काळी परिस्थिती अनुभवली. महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाऐवजी चिंतेच्या रेषा दिसत होत्या. मात्र, एकनाथ शिंदे साहेब या लाडक्या भावाचे नाव घेताच महिलांच्या चेहऱ्यावर हसू उमटले. यावरून शिंदे साहेबांवर लाडक्या बहिणींचा किती मोठा विश्वास आहे, हे स्पष्ट होते. त्याच लाडक्या भावाने पाठविलेला आनंदाचा शिधा आपल्या मुलाबाळांसाठी आणि कुटुंबासाठी घेऊन मी आज येथे आले आहे. हा केवळ शिधा नसून संकटाच्या काळात आपल्या पाठीशी कोणीतरी उभे आहे, हा विश्वास देणारा उपक्रम आहे, असेही खासदार वाघमारे यांनी सांगितले.

यावेळी शिवसेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील म्हणाले की, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या शिकवणीनुसार तसेच एकनाथ शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्त्वावर काम करत आहे. 'मदतीचे धोरण हेच शिवसेनेचे तोरण' हा विचार प्रत्यक्ष कृतीतून उतरविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

माळशिरस तालुक्यातील ५५ गावांमधील शेतकरी महिलांना एकत्रित आणून त्यांच्या हातात आनंदाचा शिधा देण्याचा कार्यक्रम खासदार ज्योतीताई वाघमारे यांच्या माध्यमातून आयोजित केला आहे. महिलांच्या हातात हा शिधा दिल्यानंतर त्या तो आपल्या लेकराबाळांसाठी घरी घेऊन जातील आणि आपल्या कुटुंबाची दिवाळी गोड करतील. आज शेतकऱ्यांवर मोठे संकट आहे; मात्र एकनाथ शिंदे साहेबांचा हात तुमच्या पाठीशी आहे आणि प्रत्येक शिवसैनिक तुमच्या सुख-दुःखात सहभागी आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

एक हजार महिलांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य!

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या कार्यक्रमात माळशिरस तालुक्यातील ५५ गावांमधील एक हजार शेतकरी महिलांना आनंदाचा शिधा वितरित करण्यात आला. दिवाळीच्या सणाच्या पार्श्वभूमीवर मिळालेल्या या मदतीमुळे उपस्थित महिलांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. राजकीय भाषणांपेक्षा प्रत्यक्ष मदतीच्या माध्यमातून सामान्य कुटुंबांपर्यंत पोहोचण्याचा शिवसेनेचा प्रयत्न या उपक्रमातून दिसून आला.या कार्यक्रमाला सोलापूरचे नगरसेवक प्रदर्शन साठे, ज्येष्ठ नेते शंकरराव हिवरकर पाटील, भीमराव भुसणार, तानाजीराव भोळे, दादासाहेब लोखंडे, भाजपचे युवा नेते मनोज जाधव, तेजस गोरे, सुनील बनकर, चेअरमन रंजीत जठार, लालासाहेब मोटे, दत्ताभाऊ गोरे, संग्राम हिवरकर पाटील यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिवसैनिक आणि मोठ्या संख्येने शेतकरी महिला उपस्थित होत्या.दुष्काळाच्या संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांना मदतीचा हात देत त्यांच्या घरात आनंदाची दिवाळी साजरी व्हावी, या भावनेतून राबविण्यात आलेला या उपक्रमाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या महिला भगिनींकडून स्वागत करत कौतुक होत आहे.

पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत प्रत्येक सफाई कामगारांना 600 चौरस फुटांचे घर मंजूर - पालकमंत्री जयकुमार गोरे

पंढरपूर, (कटूसत्य वृत्त):- पंढरपूर कॉरिडॉर अंतर्गत शहरातील 213 सफाई कामगारांना प्रत्येकी 600 चौरस फुटांचे हक्काचे घर देण्यात येणार आहे. यासाठी पहिल्या टप्प्यात 56 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, प्रत्येक सफाई कामगाराने स्वतःच्या हक्काच्या घरात राहावे, यासाठी शासन प्रयत्न शील असल्याची ग्वाही ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिली.

पंढरपूर येथे दिवाळीनिमित्त सफाई कामगारांसोबत फराळाचा कार्यक्रम आणि त्यांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी पालकमंत्री बोलत होते. यावेळीआमदार समाधान आवताडे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, माजीआमदार प्रशांत परिचारक, कामगार नेते गुरु देवडी, दिग्विजय बागल, समाधान देशमुख दिलीप धोत्रे,





नगरसेवक अनिल सावंत, नगरसेवक नागेश भोसले, तहसीलदार सचिन लंगोटे, मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्यासह मोठ्या संख्येने सफाई कामगार उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले, अतिरिक्त 150 सफाई कामगारांचा जिल्हाधिकारी यांच्याकडे प्रस्ताव प्रलंबित आहे. जिल्हाधिकारी यांनी हा प्रस्ताव मंजूर करून कामगारांना दिवाळीची भेट द्यावी. यामध्ये काही अडचणी असतील, तर त्यातून मार्ग काढण्यात येईल. सफाई कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यास शासन सकारात्मक आहे.

पंढरपूरची आषाढी वारी स्वच्छ आणि सुंदर वारी म्हणून महाराष्ट्रासह देशात आणि जागतिक स्तरावर ओळख निर्माण करीत आहे. मागील दोन-तीन वर्षांपासून आषाढी वारीच्या स्वच्छतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. या यशामध्ये सफाई कामगारांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आषाढी वारीदरम्यान आपण उत्कृष्ट स्वच्छतेचे काम केल्यामुळे पंढरपूर स्वच्छ आणि सुंदर राहण्यास मदत झाली. या कामामुळे मुख्यमंत्री आणि पालकमंत्री म्हणून आपलेही कौतुक होत आहे. मात्र, या यशाचे खरे शिलेदार सफाई कामगार आहेत, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

यावेळी आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांनीही सफाई कामगारांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. तसेच कामगारांना त्यांच्या हक्काची घरे लवकरात लवकर मिळावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अभिराज उबाळे यांनी केले. त्यांनी 2007 पासून सफाई कामगारांच्या परिस्थितीचा आढावा घेत त्यांच्या विविध समस्या मांडल्या. तसेच कामगारांना हक्काचे घर मिळावे, अशी मागणी केली.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने महिला सफाई कामगारांना भाऊबीजेची भेट पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात देण्यात आली. तसेच पुरुष सफाई कामगारांना दिवाळी भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे आणि उपस्थित मान्यवरांनी सफाई कामगारांसोबत दिवाळीचा फराळ घेतला. प्रारंभी महिला कामगारांनी दिवाळीनिमित्त पालकमंत्री महोदय यांचे औक्षण केले. जयाभाऊ क्रिकेट स्पर्धेचे प्रथम पारितोषिक 40-16 या संघाने जिंकल्याबद्दल त्या संघाचे चषक देऊन पालकमंत्री यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

वात्रटिका

जर तर ची कथा

विलिनीकरणाचा जेव्हा
केव्हा अध्याय सुरू होतो...
तेव्हा तेव्हा जर तर चाच
त्यात रंग भरला जातो...
जर असे झाले असते तर
म्हणतात तसे झाले नसते...
आज जे कोणी बोलतात
त्यांना कुठे कोण पुसते...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

बळीराजाच्या विचारांचा जागर करीत 'दैनिक कटूसत्य'च्या दिवाळी अंकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन






सोलापूर (कटूसत्य वृत्त):- बळीराजाच्या श्रमसंस्कृतीला, समतावादी विचारांना आणि शेतकरी जीवनाला सन्मानाचे स्थान देणाऱ्या बळीमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दैनिक कटूसत्यच्या दिवाळी अंकाचे विविध मान्यवरांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन करण्यात आले.

सहकार परीषदचे अध्यक्ष ना. राजन पाटील व सौ. राजश्री राजन पाटील, सरकारी वकील आनंद कुर्डूकर व सौ कुर्डूकर, सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (१) वीणा पवार आणि अतिरिक्त आयुक्त (२) संदीप कारंजे व मोहोळ नागरी पतसंस्थेचे चेअरमन कौशिक तात्या गायकवाड यांच्या हस्ते विविध ठिकाणी २०२६ दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी संपादक पांडुरंग सुरवसे व उपसंपादक सचिन जाधव उपस्थित होते.

मान्यवरांनी दिवाळी अंकाच्या माध्यमातून बळीराजाच्या विचारांचा जागर करण्याचा प्रयत्न केला आहे. बळीराजा हा श्रमाला प्रतिष्ठा देणारा, समतेचा पुरस्कार करणारा आणि प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देणारा आदर्श राजा होता. दिवाळीतील बलिप्रतिपदा हा बळीराजाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असून, त्याच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प या अंकातून व्यक्त करण्यात आला आहे.

अन्यायाविरुद्ध आवाज आणि सर्वसामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न

दैनिक कटूसत्यने आपल्या वेगळ्या भाषाशैलीतून समाजातील अन्याय, प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या अडचणींना सातत्याने वाचा फोडण्याचे काम केले आहे. शहरापासून ग्रामीण भागातील गाव-वाड्या-वस्त्यांपर्यंत पोस्टाच्या माध्यमातून दैनिक कटूसत्य पोहोचत असून, डिजिटल माध्यमातील वृत्तदर्पण न्यूज चॅनलच्या माध्यमातूनही जनतेचे प्रश्न मांडले जात आहेत. 'जिथे सोशल मीडिया, तिथे वृत्तदर्पण' या भूमिकेतून सर्वसामान्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर साहित्याचा सकारात्मक जागर

यंदाच्या दिवाळी अंकात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांचे मनोबल वाढविणारे लेख, कथा, कविता, चारोळ्या, विनोदी साहित्य आणि व्यंगचित्रांचा समावेश करण्यात आला आहे. लेखक, कवी आणि व्यंगचित्रकारांनी दर्जेदार साहित्यनिर्मिती करून अंकाची गुणवत्ता वाढविण्यास हातभार लावला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेला हा अंक जाहिरातदार आणि वाचकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास संपादक पांडुरंग हरिदास सुरवसे यांनी व्यक्त केला.

दिवाळी हा केवळ दीपोत्सव नसून मानवी मन, बुद्धी आणि विचार उजळविणारा सण आहे. समाजात सकारात्मकता, समता, बंधुता आणि जगण्याची नवी ऊर्जा निर्माण व्हावी, त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि समाजात सामाजिक समतेची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

नूतन उत्सव समितीचे अध्यक्ष अजय मोहिते यांनी निवडीनंतर आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, यावर्षी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त 'लहुजी चषक' क्रिकेट स्पर्धेसह विविध उपक्रम वर्षभर राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. लहुजी वस्ताद साळवे यांचे क्रांतिकारी आणि समाजपरिवर्तनाचे विचार विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभर सातत्याने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीतील सर्वसाधारण सभेचे सूत्रसंचालन लेखक किशोर जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय साठे यांनी मानले. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी नूतन अध्यक्ष अजय मोहिते यांचे अभिनंदन करून आगामी जयंती महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी अजय मोहिते



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांची २३२ वी जयंती येत्या १४ नोव्हेंबर रोजी उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर क्रांतिवीर लहुजी वस्ताद साळवे मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीची बैठक मध्यवर्ती समितीचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते युवा नेते अजय मोहिते यांची सन २०२६ च्या उत्सव समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली.

या बैठकीस लहुजी शक्ती सेनेचे नेते सुधाकर पाटोळे, क्रांतिवीर लहुजी शक्ती सेनेचे उपाध्यक्ष संजय साठे, लेखक किशोर जाधव तसेच आर. के. न्यूज चॅनलचे प्रमुख आर. के. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मध्यवर्ती समितीचे संस्थापक अध्यक्ष सुरेश पाटोळे यांनी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. 'जगेन तर देशासाठी, मरेन तर देशासाठी' हा निर्धार मनाशी बाळगून लहुजी वस्ताद साळवे यांनी देशसेवेसाठी आपले जीवन वाहिले. 'बलवान व्हा आणि स्वराज्य मिळवा' असे आवाहन करीत त्यांनी इंग्रजांविरुद्ध क्रांतिकारकांचे संघटन उभे केले, असे त्यांनी सांगितले.

पुणे येथील पुनवडी परिसरात त्यांनी मल्लविद्येची तालीम स्थापन केली. या तालमीत तरुणांना मल्लविद्येबरोबरच विविध शस्त्रे चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. केवळ शारीरिक सामर्थ्य नव्हे, तर जातीयता आणि अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सामाजिक समतेचे धडेही त्यांनी आपल्या शिष्यांना दिले. त्यामुळे त्यांच्या तालमीत शिक्षण घेतलेल्या अनेक तरुणांनी क्रांतिकारी कार्याबरोबरच समाजसेवेचेही महत्त्वपूर्ण कार्य केले.

रानबा गायकवाड, भागोजी नाईक, राघोजी नाईक, महात्मा जोतीराव फुले, सदाशिव गोवंडे, सखाराम परांजपे, मोरो विठ्ठल वाळवेकर, उस्मान शेख, तात्या टोपे, रंगो बापू, दौलतराव नाईक, गणू शिवाजी साळवे, वासुदेव बळवंत फडके, बाळ गंगाधर टिळक आणि अण्णासाहेब पटवर्धन यांच्यासह अनेकांनी लहुजी वस्ताद साळवे यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रभाव घेतल्याचे पाटोळे यांनी नमूद केले.

लहुजी वस्ताद साळवे यांनी सामाजिक विषमता, अनिष्ट प्रथा, पुरोहितशाही, अन्यायकारक जातीय व्यवस्था आणि समाजातील वाईट परंपरांविरोधात संघर्ष केला. बालविवाहासारख्या प्रथा नष्ट करणे, विधवांना न्याय मिळवून देणे, अस्पृश्यांना त्यांचे हक्क मिळवून देणे तसेच शिक्षणाचा प्रसार, स्त्री शिक्षण आणि वंचित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले, असेही पाटोळे यांनी सांगितले.

लहुजी वस्ताद साळवे यांच्या प्रेरणादायी कार्यापासून तरुणांनी प्रेरणा घ्यावी, त्यांच्या विचारांचा प्रसार व्हावा आणि समाजात सामाजिक समतेची भावना दृढ व्हावी, या उद्देशाने मध्यवर्ती जयंती महोत्सव समितीची स्थापना करण्यात आली आहे. समितीच्या वतीने दरवर्षी विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

नूतन उत्सव समितीचे अध्यक्ष अजय मोहिते यांनी निवडीनंतर आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, यावर्षी आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त 'लहुजी चषक' क्रिकेट स्पर्धेसह विविध उपक्रम वर्षभर राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. लहुजी वस्ताद साळवे यांचे क्रांतिकारी आणि समाजपरिवर्तनाचे विचार विशेषतः तरुण पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी वर्षभर सातत्याने प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीतील सर्वसाधारण सभेचे सूत्रसंचालन लेखक किशोर जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन संजय साठे यांनी मानले. यावेळी उपस्थित समाजबांधवांनी नूतन अध्यक्ष अजय मोहिते यांचे अभिनंदन करून आगामी जयंती महोत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

जिल्हा बँक निवडणुकीत नवा ट्विस्ट !

सात जणांना धक्का, परिचारकांना दिलासा



सोलापूर (कटूसत्य वृत्त):- जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणुकीत सात मातब्बरांचे अपील फेटाळले गेले असताना,विभागीय सहनिबंधकांनी माजी आमदार प्रशांत परिचारक यांना दिलासा दिल्यामुळे याची सध्या जिल्हाभर चर्चा होत आहे.माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, माजी आमदार दिलीप माने, माजी आ. संजयमामा शिंदे, सुरेश हसापुरे आणि बबनराव आवताडे यांच्यासह सात दिग्गजांना संचालक मंडळाच्या -धापुर जिल्ला सहकारी बैंक पर्वाचित सोलापूर सस निवडणुकीसाठी विभागीय सह निबंधकांनी 'रेड सिग्नल' दाखवला आहे. मात्र, याच संचालक मंडळात असणाऱ्या माजी आ. प्रशांत परिचारक यांना 'ग्रीन सिग्नल' मिळाला आहे. पुणे विभागीय सह निबंधक दिग्विजय अहिर यांनी दिलेल्या निकालानुसार,सहकार आयुक्तांच्या २९ मे २०१८ रोजीच्या कलम ११० (अ)च्या आदेशापूर्वीच, म्हणजेच १४ मे २०१८ रोजी परिचारक यांनी उपविधी क्र. ३२. ३ मधील तरतुदींनुसार बँकेच्या चेअरमन यांच्याकडे राजीनामा दिल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट झाले.मात्र, प्रतिवादी क्र. १ यांनी आदेश पारित करताना ही बाब विचारात घेतली नव्हती. तसेच उच्च न्यायालयाचे संदर्भ आणि कागदपत्रे विचारात घेऊन परिचारक यांचे अपील मंजूर करण्यात आले. दरम्यान, इतर उमेदवारांचे अपील फेटाळण्यात या मुद्द्यांमुळे सात जणांना 'रेड सिग्नल' इतर अर्जदारांनी संचालक पदाचा राजीनामा अध्यक्षांना उद्देशून दिल्याचे दिसून येते.

तसेच सहकार मंत्र्यांकडे कलम ८८ अन्वयेचे आदेश आव्हानीत असून त्यास अद्याप स्थगिती मिळालेली नाही. कलम ७३ (कअ) ची अपात्रता कायम असताना निवडणूक लढवण्यासाठी नामनिर्देशन पत्र मंजूर करणे उचित नाही, असे रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्यासह इतरांचे अर्ज फेटाळताना स्पष्ट करण्यात आले. काही उमेदवार २९ मे २०१८ रोजीच्या (चुकीने छापलेल्या २०२८ ऐवजी) कलम आले. ११० (अ) च्या आदेशावेळी संचालक असल्याचे स्पष्ट झाल्याने, ते कलम ७३ (कअ) (३ अ) मधील अपात्रता धारण करीत आहेत. ३ अर्जदारांनी २८ ऑक्टोबर रोजी बँकेकडे जबाबदार धरलेली रक्कम भरण्याची तयारी दर्शवली असली, तरी छाननीच्या वेळी आणि आजही कलम ८८ अन्वये निश्चित केलेली जबाबदारीची रक्कम त्यांच्याकडे कायम आहे. त्यामुळे अपात्रता कायम असताना निवडणूक लढवण्याचे नामनिर्देशन पत्र मंजूर करणे अयोग्य ठरत असल्याचे सह निबंधकांनी जाहीर केले. असून, हे उमेदवार आता कोर्टात जाणार असल्याने याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

माजी आमदार शिंदे यांच्याकडे उपसा सिंचनचे पाणी विठ्ठलवाडीच्या तलावात सोडण्याची मागणी



मानेगाव (कटूसत्य वृत्त):- दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर माढा तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर उजनी धरणातून कार्यान्वित करण्यात आलेल्या सीना-माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी विठ्ठलवाडी येथील माळावरील पाझर तलावात तातडीने सोडण्यात यावे, अशी मागणी विठ्ठलवाडी येथील शिष्टमंडळाने माजी आमदार बबनराव शिंदे यांच्याकडे केली आहे.

रविवारी, ८ नोव्हेंबर रोजी निमगाव (टें) येथे शिष्टमंडळाने माजी आमदार बबनराव शिंदे यांची भेट घेऊन गावातील पाणीटंचाई व शेतकऱ्यांसमोरील विविध समस्यांबाबत चर्चा केली. पावसाने ओढ दिल्याने परिसरातील शेतकरी अडचणीत सापडले असून, पिकांना करपू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

यावेळी शिष्टमंडळाने ऊस गाळपासाठी तातडीने ऊसतोडणी टोळ्या उपलब्ध करून देण्याचीही मागणी केली. यावर लवकरच ऊसतोडणी टोळी अथवा ऊसतोडणी मशीन उपलब्ध करून देण्याची ग्वाही देण्यात आल्याचे शिष्टमंडळातील सदस्यांनी सांगितले.

दरम्यान, सीना-माढा उपसा सिंचन योजनेचे आवर्तन सुरू होऊन अनेक दिवस उलटले असले तरी या योजनेच्या टेल एन्डला असलेल्या विठ्ठलवाडीच्या पाझर तलावात अद्याप पाणी पोहोचले नसल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे. गावातील पिण्याच्या पाण्याची गरज तसेच जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न लक्षात घेता उपसा सिंचन योजनेचे पाणी पाझर तलावात तातडीने सोडणे आवश्यक असल्याचे शेतकऱ्यांनी नमूद केले.

यासंदर्भात जिल्हाधिकारी, कुडुर्वाडी येथील उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे. या मागणीची दखल घेत माजी आमदार बबनराव शिंदे यांनी सकारात्मक भूमिका घेत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून विठ्ठलवाडीच्या तलावात पाणी सोडण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

शिष्टमंडळाने माजी आमदार संजयमामा शिंदे यांचीही भेट घेऊन उपसा सिंचन योजनेचे पाणी विठ्ठलवाडीच्या पाझर तलावात तातडीने सोडण्याची मागणी केली. दुष्काळी परिस्थिती अधिक गंभीर होण्यापूर्वी पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा, अशी अपेक्षा ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.यावेळी मोहन कदम, पतसंस्थेचे चेअरमन अनिलकुमार अनभुले, सोसायटीचे उपाध्यक्ष भिमराव शिंगाडे, सतीश गुंड, धनाजी सस्ते यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.

सयाजीराजे मोहिते पाटील यांच्या हस्ते सहकार महर्षी साखर कारखान्याचे लक्ष्मी पूजन



अकलूज (कटूसत्य वृत्त):- अकलूज व परिसरातील सहकारी संस्था व्यापाऱ्यांच्या वही पूजन, लक्ष्मीपूजन व सरस्वती पूजन मोठ्या उत्साहात व धार्मिक परंपरेनुसार संपन्न झाले. शंकरनगर येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे लक्ष्मीपूजन व सरस्वती पूजन संचालक चिरंजीव सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील, व्हाईस चेअरमन शंकरराव माने देशमुख, कार्यकारी संचालक सुहास यादव, संचालक सर्वश्री प्रकाश पाटील, सुरेश मेहेर, सावंत आबा व कारखान्याचे आजी माजी संचालक उपस्थित होते.

शिवामृत दूध उत्पादक सहकारी संघ येथे खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते तसेच शिवरत्न शिक्षण संस्था, शिवशंकर बाजार, सुमित्रा नागरी पतसंस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती, शिक्षण प्रसारक मंडळ येथेही वही पूजन व लक्ष्मीपूजन सरस्वती पूजन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस, मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे, इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल
सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर. 9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण


पाहिजेत
चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता सिक्युरिटी गार्ड त्वरित पाहिजे. संपर्क 9145451809 भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र
आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) सतत कार्यरत राहणारा एक छोटा जीव २) एक उपदिशा ३) रात्रीच्या वेळचे जेवण (इंग्रजीत) ४) हिंदी चित्रपट निर्माता-** चोप्रा ५) इंदिरा गांधींच्या आईचे नाव-*** नेहरू ६) भीती (हिंदीत) ७) पोस्ट, पत्र ९) रंगिला चित्रपटातील महाराष्ट्रीयन अभिनेत्री १०) मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष संक्षिप्तमध्ये लिहा-*** ११) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो १२) संशय (हिंदीत) १३) मंत्र्यांच्या नावापुढे येणारे विशेषण १४) शक्तीमान, ताकद असलेला १५) वृक्षाच्या मुळ्या आणि फांद्या यांच्यामधील भाग १८) चिंच (हिंदीत) २०) क्रिकेट स्पर्धेसाठी वापरला जाणारा चेंडू-*** बॉल २१) महाराष्ट्रातील सर्वोच्च शिखर २५) नक्कल करणारा २७) एक म्हण-****** अक्कल नसते २८) श्रीरामाचा एक बंधू ३०) ख्रिश्चन धर्मसेविका ३२) नजीक, समीप ३४) हा चिरताना डोळ्यात पाणी येते ३५) यशाचे सूत्र, गुपित ३६) देवाचे चिंतन, नमस्कार ३७) पध्दत, रीत (हिंदीत) ३९) हिंदी न्यूज चॅनेल-** तक ४१) क्षण (हिंदीत) ४२) फर्निचरसाठी या वृक्षाचे लाकूड वापरतात

आडवे शब्द : १) आयपीएलमधील अंबानींचा संघ ५) चवीला कडू असे ८) शन उलट लिहा ९) वय (हिंदीत) १०) प्रतिष्ठीत, सन्माननीय १२) जुन्या हिंदी चित्रपटातील एक अभिनेत्री-*** टागोर १३) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पत्र्याची पट्टी १४) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १५) सर्दी बरोबर हा येतो १६) बशीचा जोडीदार १७) क्रिकेटमध्ये गोलंदाजाने बाहेरच्या बाजूस टाकलेला चेंडू, रूंद (इंग्रजीत) १९) तहसीलदार २१) शपथ (हिंदीत) २२) वस्तूचे मूल्य, भाव २३) गोधडी २४) मग्न, एकरूप २६) टेकडी (हिंदीत) २९) मुलाची पत्नी, स्नुषा ३१) लाकूड कापताना होणारा आवाज ३२) जीभ, दिलेला शब्द (हिंदीत) ३३) एक दाक्षिणात्य सुपरस्टार अभिनेता ३५) गाणे गाणारा, गायक ३६) होकारच्या विरूध्दार्थी ३८) कपड्यावरील कचरा घाण ३९) आंब्याचा रस ४०) त्रास, फ्ल्यू (मराठीत) ४३) सलमान, संजय दत्त आणि माधुरी दीक्षित अभिनीत एक चित्रपट ४४) मुंबईतील हा गणपती प्रसिध्द आहे-**** चा राजा

सुडोकु - 96

	4	9		3	1			
	3			7		9	8	
8				4				
		6	1	5	7	8		2
	5		2	8	4	1		6
	1							5
	8	5	7		3	4		9
		2			5	3	7	
		4		2		5		1

दै. कटूसत्य च्या वर्धापनदिनास व
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !



मा. सौ. उत्कर्षाराणी पलंगे
मा. प्रथम नगराध्यक्षा
नातेपुते नगरपंचायत



मा. श्री. मालोजीराजे देशमुख
मा. उपनगराध्यक्ष
नातेपुते नगरपंचायत

शुभेच्छुक
हर हर महादेव ग्रामीण बिगरशेती सह पतसंस्था
आझाद तरुण मंडळ : समस्त हिंदू खाटिक समाज
नातेपुते ता. माळशिरस जि.सोलापूर

दीपावली
निमित्त सर्व बांधवांना
हार्दिक शुभेच्छा !



दै. कटूसत्य च्या वर्धापनदिनास व
दिवाळीच्या हार्दिक हार्दिक शुभेच्छा !



शिवसेना जिल्हा प्रमुख

शिवसेना



शुभेच्छुक :- सोलापूर जिल्हा शिवसेना
राजगड ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था
राजगड नॉलेज सिटी
राजगड विद्यामंदिर मुक्त विद्यालय
नातपुते ता. माळशिरस जि.सोलापूर

मा. श्री. राजकुमार हिवरकर पाटील

शुभ दीपावली

दै. कटूसत्य च्या वर्धापनदिनास व
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

प्रेरणा



साईकृपा ग्रामीण बिगर
शेती सहकारी
पतसंस्था

नातेपुते ता. माळशिरस
जि. सोलापूर



कै. संजय तुकाराम बरडकर

चेअरमन
श्री. कैलास दत्तात्रय बरडकर

व्हा. चेअरमन
श्री. केशव दत्तात्रय ठोंबरे

सचिव
श्री. निलेश औदुंबर पोटदार

शुभेच्छुक:-
सर्व संचालक, सभासद, कर्जदार,
कर्मचारी व पिग्मी एजंट

NCAP NATIONAL CLEAN AIR PROGRAMME
सोलापूर महानगरपालिका
LiFE Lifestyle for Environment

जलसंपत्ती जपूया,
निसर्गाशी नाते घट्ट करूया!

सोलापूर महानगरपालिका

शुभ दीपावली

आपल्या परिसरातील विहिरी, तलाव, बांध
आणि जलस्त्रोत स्वच्छ ठेवूया, त्यांचे पुनरूजीवन
करूया आणि जलसमृध्द भविष्य घडवूया!

पर्यावरणपूरक
दिवाळी साजरी करा!
- कमी धूर व कमी आवाजाचे 'ग्रीन फटाके' वापरा.
- वायू प्रदूषण टाळा.
- दिये, पणत्या व विधुतरोषणाईने दिवाळी उजळवा.

गरजेपूरतेच
पाणी वापरा!
- नळ गळती त्वरित दुरूस्त करा.
- पावसाचे पाणी साठवा (रेन वॉटर हर्विस्टिंग) करा.
- पाण्याचा पुनर्वापर करा.

कचरा उघड्या ठिकाणी
टाकू नका!
- कचरा नेहमी कचरापेटीतच टाका.
- ओला व सुका कचरा वेगळा करा.
- परिसर स्वच्छ व सुंदर ठेवा.

झाडे लावा,
झाडे जगवा!
- प्रत्येक नागरिकाने एक तरी झाड लावा.
- लावलेल्या झाडांची नियमित देखभाल करा.
- हिरवाई वाढवा, शहरांचा पर्यावरणीय समतोल राखा.

श्री. विनायक रामकृष्ण कोंड्याल
महापौर सो. म. पा.

श्री. डॉ. सचिन ओम्बासे
आयुक्त सो. म. पा.

सौ. ज्ञानेश्वरी महेश देवकर
उपमहापौर सो. म. पा.

श्री. नरेंद्र गोविंद काळे
सभागृह नेता सो. म. पा.

सौ. रंजिता सकलेश चाकोते
स्थायी समिती सभापती सो. म. पा.

व सर्व पदाधिकारी, सर्व नगरसेवक, व अधिकारी वर्ग सो. म. पा.